# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.07.2025** **वार:मंगळवार**

1. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा गडकिल्ल्यांना जागतिक वारसा म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाल्याबद्दल विधानसभेत आनंदोत्सव; वारसा जपण्याचं मुख्यमंत्र्याचं आवाहन
2. मकोका कायद्यात सुधारणा करणारं विधेयक विधान परिषदेतही एकमतानं मंजूर
3. भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह अन्य तिघांचा परतीचा प्रवास सुरू आणि
4. अँडरसन तेंडूलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताचा इंग्लंडकडून 22 धावांनी पराभव

**मुख्यमंत्री-किल्ले**

छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्ग संपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणं, ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत काढले. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग आणि खान्देरी हे राज्यातले 11 किल्ले आणि तमिळनाडूतला जिंजी यांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. या ऐतिहासिक क्षणाबद्दल मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, सांस्कृतिक कार्य मंत्रालय, पुरातत्व आणि वस्तूसंग्रहालय संचलनालय आणि यासाठी योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांचे, महाराष्ट्रातल्या जनतेचे आभार मानले. या वारसा स्थळांची जपणूक करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले....

**हे आपल्यापुढे एक मोठे आव्हान आहे. यासाठी मी महाराष्ट्रातील जनतेलाही आवाहन करतो की छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या अद्वितीय किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी हातभार लावावा. या सभागृहाच्या माध्यमातनं मी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांचे विशेष आभार मानू इच्छितो याचं कारण त्यांच्याकडे देशातल्या वेगवेगळ्या भागातून सात प्रस्ताव युनेस्को मध्ये नॉमिनेट करण्याकरता गेले होते त्यापैकी माननीय प्रधानमंत्री मोदी यांनी निर्णय केला की छत्रपती शिवरायांचे किल्ले हेच जागतिक वारसा स्थळ म्हणून त्या ठिकाणी नॉमिनेट करायचे.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 गड किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान मिळाल्याबद्दल विधानभवनाच्या परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अभिवादन करुन, काल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातले इतर मंत्री आणि आमदार यावेळी उपस्थित होते.

**मकोका-सुधारणा**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम 2025 अर्थात मकोका कायद्यात सुधारणा करणारं विधेयक काल विधानपरिषदेत एकमतानं मंजूर करण्यात आलं. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी हे विधेयक मांडलं. राज्यात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कठोर पावले उचलण्यासाठी हे विधेयक आणण्यात आलं असल्याचं कदम यांनी सांगितलं. या सुधारणा विधेयकामुळे अमली पदार्थांच्या तस्करीसाठी जबाबदार असलेल्या संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाईसाठी मार्ग मोकळा होणार आहे, असं ते म्हणाले. विधानसभेत हे विधेयक या आधीच मान्य झालं आहे.

**धर्मांतर**

राज्यात लवकरच धर्मांतरविरोधी कायदा आणला जाईल, असं गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. दौंड तालुक्यात केडगाव इथल्या पंडिता रमाबाई मुक्ती मिशन संस्थेत शिकणाऱ्या मुलींवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती, त्यांच्याशी चुकीची वर्तणूक इत्यादी आरोपांच्या अनुषंगानं लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक पदावरच्या महिला अधिकाऱ्याची समिती नेमली असून तिचा अहवाल एका महिन्यात मिळेल, त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. या वर्षी मार्च महिन्यात हैदराबादहून जेएनपीटीच्या दिशेनं निघालेल्या दोन कंटेनर्समध्ये सुमारे 57 हजार किलो गोमांस सापडल्याप्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना करून चौकशी करण्याची घोषणाही भोयर यांनी केली.

**विदर्भ-पूर-मदत**

विदर्भात नागपूर आणि अमरावती विभागात 8 आणि 9 जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला असून प्रशासनाला मदत आणि पुनर्वसन कार्य तत्काळ आणि प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत; अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी निवेदनाद्वारे विधानसभेत दिली. अनधिकृत बांधकामांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घालणार नाही; अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानसभेत दिली. जर अधिकारी अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालत असल्याचं आढळले, तर त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाईल, असं शिंदे यांनी सांगितलं.

**आंतरराष्ट्रीय-सहकारिता वर्ष**

आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष 2025 साजरं करताना पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण यासारख्या उपक्रमांवर अधिक भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी झालेल्या बैठकीत फडणवीस बोलत होते.

**ज्ञानराधा**

बीडमधल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित आरोपींवर तत्काळ कारवाई करावी. तसंच सोसायटीच्या उर्वरित 238 मालमत्ता तातडीनं जप्त करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल या संबंधातल्या बैठकीत दिले.

**AXIOM**

ॲक्सिओम फोर मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी 3 वाजता पृथ्वीवर परतणार आहेत. परत आल्यानंतर हे अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी विलगीकरणात राहतील. परतीच्या प्रवासाआधी शुक्ला यांनी सर्वांशी संवाद साधला. अंतराळातून दिसणारा भारत आजही अंतराळवीर राकेश शर्मा यांनी 41 वर्षांपूर्वी म्हटल्याप्रमाणे 'सारे जहाँसे अच्छा' असल्याचं शुक्ला म्हणाले....

**कमाल की यात्रा रही है ये मेरी लेकिन अब जैसे मेरी ये यात्रा खत्म होने वाली है, आपकी और मेरी यात्रा अभी बहुत लंबी है। हमारी ह्यूमन स्पेस मिशन की जो यात्रा है वो बहुत लम्बी है और बहुत कठिन भी है। लेकिन मैं आपको विश्वास दिलाता हूँ की अगर हम निश्चय कर ले तो तारा अभी थे इवेन स्टार्स अरे अटेनेबल इकतालीस साल पहले कोई भारतीय अंतरिक्ष में गए थे और उन्होंने हमें बताया था की ऊपर से कैसा दिखता है और कहीं न कहीं मुझे लगता है कि हम सब ये जानना चाहते हैं की आज भारत कैसा दिखता है। मैं आपको बताता हूँ आज का भारत स्पेस से महत्वाकांक्षी दिखता है। आज का भारत निडर दिखता है। आज का भारत कॉन्फिडेंट दिखता है। आज का भारत गर्व से पूर्ण दिखता है और इन्ही सब कारणों की वजह से मैं एक बार फिर से कह सकता हूँ की आज का भारत अभी भी सारे जहाँ से अच्छा दिखता है।**

**रसायनशास्त्र-ऑलिम्पियाड**

संयुक्त अरब अमिरातीमधल्या दुबई इथं झालेल्या 57 व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिंपियाड स्पर्धेत सहभागी झालेल्या चारही भारतीय विद्यार्थ्यांनी 2 सुवर्ण आणि 2 रौप्य पदकं जिंकली. यामध्ये जळगावच्या देवेश पंकज भैया याचा समावेश असून त्याला सुवर्णपदक मिळालं आहे. 90 देशांतल्या 354 विद्यार्थ्यांमध्ये भारतीय मुलांनी बाजी मारली असून पदकतालिकेत सहावं स्थान मिळवलं आहे.

**सरनाईक**

राज्य परिवहन अर्थात एसटीचं खासगीकरण कोणत्याही परिस्थितीत होणार नाही. कर्मचाऱ्यांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काल मुंबईत एका कार्यक्रमा दरम्यान केलं. राज्यातल्या रस्त्यांवरच्या सुरक्षिततेबाबत व्यापक आराखडा तयार करण्यात येणार असून महामार्गांवर अपघातानंतर तातडीनं मदत मिळावी, यासाठी एअर ॲम्बुलन्स सेवा सुरू करण्यात येणार असल्याचं सरनाईक यांनी एका बैठकीदरम्यान सांगितलं. अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांनी सज्ज वाहनं तैनात केली जाणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.

**रत्नागिरी-आंबा**

आत्मनिर्भर भारत उपक्रमा अंतर्गत राबवण्यात येत असलेल्या 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनेत रत्नागिरी जिल्ह्यानं सुवर्णपदक मिळवून देशात अव्वल स्थान प्राप्त केलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपममध्ये काल झालेल्या राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात रत्नागिरी जिल्ह्याला हापूस आंबा पिकासाठी 'एक जिल्हा एक उत्पादन' राष्ट्रीय पुरस्कार 2024 प्रदान करण्यात आला. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम.

देवेंदर सिंह यांनी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते हा सन्मान स्वीकारला. एक जिल्हा एक उत्पादन योजना देशाच्या प्रत्येक जिल्ह्यातून निवडलेल्या उत्पादनाच्या ब्रँडिंग आणि प्रोत्साहनासाठी राबवली जाते.

**निधन-सोलापूर**

राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव सुनिल बंडगर यांचं काल पहाटे मैंदर्गी इथं हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झालं. ते 50 वर्षांचे होते. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांचे समर्थक म्हणून बंडगर यांनी राष्ट्रीय समाज पक्षाच्या विविध पदांवर कामं केलं होती.

**क्रिकेट**

इंग्लंडविरुद्धच्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात भारताला 22 धावांनी पराभव पत्करावा लागला. यजमान संघानं दिलेल्या 193 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा डाव 170 धावांवर आटोपला. भारतानं काल 4 बाद 58 धावांच्या पुढे खेळ सुरू केला; रविंद्र जडेजानं सर्वाधिक 61 धावा केल्या; मात्र त्याची एकाकी झुंज अपयशी ठरली. या विजयामुळे पाच सामन्यांच्या या मालिकेत इंग्लंडनं 2-1 अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतला चौथा सामना ओल्ड ट्रफोर्ड इथं खेळवला जाणार आहे.

**कोयना-सातारा**

कोयना धरणातली पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी आज धरणाचे सहा वक्र दरवाजे दीड फुटानं उघडून पाच हजार क्युसेक पाणी नदीपात्रात सोडण्यात येणार आहे. सध्या पायथा विद्युतगृहाचे दोन्ही संच सुरू असून त्याद्वारे 2 हजार 100 क्युसेक विसर्ग सुरू असल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे.

**हवामान**

राज्यात तुरळक ठिकाणी पावसाच्या सरी पडत असून उद्यापर्यंतच्या अंदाजानुसार कोकणात बऱ्याच ठिकाणी आणि उर्वरित राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.